सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर | बुधवार, ६ मे २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com | ९

## महत्वाचे...



### बसचे स्टिअरिंग रॉड तुटले; अपघातातून बचावले प्रवाशी

**सोलापूर, दि.५ मे-**

पंढरपूर तिऱ्हे मार्गे सोलापूर मार्गावर धावणाऱ्या एका बसचे स्टिअरिंग रॉड तुटल्याने रस्त्यालगत चारीत आदळली. त्यावेळी बसमधील प्रवासी, चालक आणि वाहक थोडक्यात बचावले. मंगळवेढा आगाराची मोडकळीस आलेली ही बस मुक्कामी कोथाळे गाडी असून ती भल्या सकाळी सोलापूरकडे निघते. त्यात महाविद्यालयातील विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी वर्गातील नागरिक नियमित प्रवास करतात. मंगळवारी सकाळी ही बस पंढरपूर रोडवर कुरुलपासून एक किमी अंतरावर स्टिअरिंग रॉड तुटल्याने निकामी झाली अन् कुणालाही कांहीं कळायच्या आत रस्त्यालगतच्या मुंग्यांचे वारुळ तोडून चारीत आदळली.



### बारावी पुरवणी परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया सुरु

**सोलापूर, दि.५ मे-**

इयत्ता बारावीच्या पुरवणी परिक्षेसाठी अर्ज प्रक्रिया सुरु झाली आहे. नियमित शुल्कासह १५ मेपर्यंत अर्ज भरण्याची संधी देण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी, असे आवाहन माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी केले आहे. या परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी, पूर्वी नावनोंदणी केलेले पण फेब्रुवारी-मार्च परीक्षेस प्रविष्ट न झालेले खाजगी विद्यार्थी, तसेच नवीन नोंदणी केलेले खासगी विद्यार्थी अर्ज करू शकतात. याशिवाय श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व काही विषयांसाठी पुन्हा परीक्षा देणारे विद्यार्थी तसेच आयटीआय विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही संधी देण्यात आली आहे. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून विद्यार्थ्यांनी शासकीय संकेतस्थळावरून अर्ज भरायचे आहेत. विलंब शुल्कासह १६ मे ते २० मे दरम्यान अर्ज स्वीकारले जाणार आहेत. महाविद्यालयांनी अर्ज सबमिट केल्यानंतर 'प्रिलिस्ट' तपासून विद्यार्थ्यांकडून खात्री करून घ्यावी व प्राचार्यांनी त्यावर स्वाक्षरी व शिक्का बंधनकारक आहे, असे मंडळाचे सचिव डॉ. माळी यांनी सांगितले.

**नियमित शुल्कासह १५ मेपर्यंत मुदत**




### रूपाभवानी मंदिरासमोरील नाल्यात आढळला मृतदेह

**सोलापूर, दि.५ मे-**

रूपा भवानी मंदिर समोरील घाण पाण्याच्या नाल्यात एका अनोळखी महिलेचा कुजलेला मृतदेह आज मंगळवारी सायंकाळी मिळून आला.मयत महिलेचे वय अंदाजे ४५ ते ५० वर्ष इतके आहे. आज मंगळवारी सायंकाळी स्थानिक लोकांना या महिलेचा मृतदेह घाण पाण्याच्या नाल्यामध्ये आढळून आला. मृतदेह पाण्यामध्ये पडून राहिल्याने ते कुजुन गेले होते. ही खबर जोडभावी पेठ पोलिसांना समजली असता हवालदार आर.डी. दुधाळे यांनी घटनास्थळी पोहचून इतरांच्या मदतीने सदरचा कुजलेला मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी साडेसहा वाजता दाखल केला.

### आवाटी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जेऊर, दि.५ मे-**

आवाटी येथील कै. जनाबाई एकनाथ खताळ सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये अलीम मोहम्मद मुलाणी व स्नेहश्री अप्पाराव बंडगर या दोन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले होते. वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत खताळ यांनी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आवाटी गावातील एकनाथ खताळ, नागनाथ तरटे, रमेश वाघमोडे, पटेल, धर्मा शिंदे, आझाद खान, युसुफ पटेल, मोहम्मद मुलाणी, फत्तेखा मुलाणी, दत्ता सोनवर, रंगनाथ नलवडे, काझी शफिक, आप्पाराव बंडगर उपस्थित होते.

# ६० वर्षांची प्रतिक्षा संपली; शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेचा जूनपासून श्रीगणेशा

**सोलापूरसह धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची सोय** | **सोलापूरकरांसाठी आनंदाची बातमी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

६० वर्षांच्या प्रतिक्षेनंतर सोलापूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयास मंजुरी मिळाली आहे. येत्या जूनपासून प्रवेश प्रक्रियेचा श्रीगणेशा होणार आहे. या अभियांत्रिकी महाविद्यालयसंदर्भात आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या प्रयत्नाला यश आले. या महाविद्यालयमुळे सोलापूरसह धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.

सन २०१६ साली राज्य सरकारने सोलापूर, लातूरसह अन्य सहा ठिकाणच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयांचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात रुपांतर करण्याची घोषणा केली होती. त्यासंदर्भात सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्राचार्यांनी रितसर प्रस्तावसुध्दा दाखल केला होता. परंतु सदर प्रस्ताव प्रलंबित होता. सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनची ३४ एकर जागा असून सुसज्ज इमारत आहे. तज्ज्ञ प्राध्यापक आणि पुरेसा कर्मचारी वर्गसुध्दा असल्याने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास हरकत नाही, असे तज्ज्ञांचे मत होते. यासाठी वारंवार प्राचार्यांकडून पाठपुरावा झाला होता. मात्र शासनाकडून हिरवा कंदील मिळाला नव्हता. दरम्यान, मागील वर्षी सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी ३०० कोटी रुपये देण्याची घोषणा ना.चंद्रकांत पाटील यांनी केली होती. इतर शहराप्रमाणे सोलापुरातही प्रवेश प्रक्रिया सुरु व्हावी; यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

**कष्टकरी वर्गांचे पाल्य हुशार, मेहनती**

सोलापूर शहरात विडी, यंत्रमाग, वस्त्रोद्योग, रेडिमेड अशा विविध क्षेत्रात कष्टकरी वर्ग मोठ्या संख्येने राहतात. त्यांचे पाल्य हुशार, मेहनती आहेत. परंतु त्यांना खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा खर्च परवडण्यासारखे नाही. सोलापुरात अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्याने त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत होते.

**सुरु होणारे तीन अभ्यासक्रम...**

सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून पदवीस्तराचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. यामध्ये एआय अ‍ॅन्ड मशिन लर्निंग, कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅन्ड इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलिकम्युनिकेशन अभ्यासक्रमाचा समावेश आहे. अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी ६० प्रवेश क्षमता आहे.

**नव्या पिढीला ज्ञानाची भूक**



नव्या पिढीला तंत्रशिक्षण अभियांत्रिकी शिक्षणासह ज्ञानाची भूक आहे. परंतु बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना अभियंता होण्याच्या स्वप्नांना मुरड घालावी लागत होते. ही बाब लक्षात घेऊन सोलापुरातच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु व्हावे; यासाठी केलेल्या पाठपुराव्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आदींची मोलाची साथ लाभली, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.





## सोलापूरच्या तापमानात घट

**● उन्हाचा तडाखा मात्र कायम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूरमध्ये आज, ५ मे २०२६ रोजी उष्णतेचा तडाखा जाणवत असून, तापमानात मात्र किंचित बदल झाला आहे. आजचे कमाल तापमान ३९ अंश सेल्सिअस इतके होते. गेल्या ८ दिवसांत ४० ते ४२ पर्यंतच तापमानाचा पारा दिसून येत आहे.

आज दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र आणि सूर्यप्रकाशित होते. दुपारच्या सत्रात उन्हाचा तडाखा असल्याने अनेकांनी घराबाहेर न पडणेच पसंद केले. १ मे ते आजतागायत ४० अंश ते ४२ अंशापर्यंत तापमान होते. आज दुपारच्या वेळी उन्हाच्या तीव्र झळा जाणवत असल्याने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. जिल्ह्याच्या काही भागात आभाळी वातावरण होते; दरम्यान, येत्या ७ ते ८ मे दरम्यान काही अंशी ढगाळ वातावरण किंवा हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.




## झेडपीत बदली प्रक्रिया लांबली

**अर्थ विभाग व चालकांच्या बदल्यांवर प्रश्नचिन्ह**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

सोलापूर जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांच्या बहुप्रतिक्षित बदल्यांची प्रक्रिया मंगळवारपासून सुरु होणार होती. मात्र प्रशासकीय कारणांमुळे ही प्रक्रिया १२ मेपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. अर्थ विभाग व चालकांच्या बदल्यांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अनेक वर्षे एकाच विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना इतरत्र हलवण्याचा निर्णय तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी घेतला होता. विशेषतः अर्थ विभागातील कर्मचाऱ्यांच्याही बदल्या करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पदभार स्वीकारताच प्रशासन विभागाने नव्याने बदली कार्यक्रम आखला असला तरी अर्थ विभागातील कर्मचारी, बदली व पदोन्नतीनंतर पुन्हा मुख्यालयात स्थायिक झालेल्यांना वगळण्यात येत असल्याची चर्चा रंगली आहे. १२ मेपासून समुपदेशनाच्या माध्यमातून बदल्यांची प्रक्रिया राबवण्याचे नियोजन होते. मात्र, पीसीआर समितीने निर्देशित केलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील ह्या मुंबईत असल्याने ही प्रक्रिया लांबली आहे. जिल्हा परिषदेतील परिचर व इतर कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत असताना, गेल्या दहा वर्षांपासून चालकांच्या बदल्या न झाल्याने नाराजी वाढली आहे. त्यामुळे या प्रक्रियेत चालकांचाही समावेश करावा, अशी मागणी जोर धरत आहे.



**१२ मे पर्यंत स्थगिती**

**फायली आणि प्रलंबित अहवाल**

काही कर्मचाऱ्यांविरुध्दच्या तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईच्या फायली दाबून ठेवल्याचीही चर्चा रंगली आहे. शिस्तभंगाच्या प्रकरणांवरील अहवाल अद्यापही समोर न आल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## सोलापूर-गोवा विमानसेवा 'फुल्ल'; प्रवाशांचा मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

उन्हाळा असल्याने पर्यटनासाठी सोलापूरकरांची पावले मोठ्या संख्येने गोव्याकडे वळत आहेत. यामुळे सोलापूर-गोवा आणि गोवा-सोलापूर या विमान सेवेला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

सध्या सोलापूरहून गोव्याला जाणाऱ्या प्रत्येक दिवसाचे विमान फुल्ल झाले आहे. त्यामुळे तिकीट दरही वाढल्याचे सांगण्यात आले. गोव्याचा २७०० रुपये बेसिक दर असून, नागरिकांची हवाई प्रवासासाठी सध्या गर्दी पडत असल्याने तिकीट सध्या ५ हजार १०० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. ऐनवेळी तिकीट घेणाऱ्यांना तर १२ ते १८ हजार रुपये मोजावे लागत आहेत. सोलापूर ते गोवा या विमान प्रवासाचा बेसिक दर साधारणपणे २७०० रुपयांपासून सुरु होतो. मात्र, सध्या उन्हाळी सुट्यांमुळे तिकीटांची मागणी प्रचंड वाढली आहे.

प्रवाशांचा वाढता प्रतिसाद आणि डायनॅमिक प्रायसिंगच्या धोरणामुळे हेच तिकीट आता थेट १८,००० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. विमान फुल्ल असल्याने प्रवाशांना नाईलाजाने जादा पैसे मोजून तिकीट काढावे लागत आहे. एकंदरीत, हौसेला मोल नाही असाच काही प्रकार या विमानसेवेसाठी दिसून येत आहे.




## सुवर्ण परिवारातर्फे मोफत व्रतबंध कार्यक्रम

**मंगळवेढा :** महाराष्ट्र सुवर्ण परिवार ग्रुपतर्फे यावर्षीपासून पांचाळ सोनार समाजातील मुलांसाठी विनाशुल्क, मोफत व्रतबंध सोहळा आयोजित केला असल्याची माहिती महाराष्ट्र सुवर्ण परिवार ग्रुपचे प्रवर्तक रत्नाकर वेदपाठक यांनी दिली.

सुवर्ण परिवार ग्रुपने यापूर्वीही असेच समाजोपयोगी उपक्रम म्हणजे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, गरजवंत सुशिक्षित बेरोजगार मुला-मुलींसाठी नोकरी उपक्रमही राबवला होता. त्यामुळे अशा अभिनंदनीय उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे. समाजातील इतरही सामाजिक संस्थांनी अशाच पद्धतीचे अनुकरणीय समाजोपयोगी व गरजवंतांसाठी विनाशुल्क आवश्यक असे कार्यक्रम राबवावेत,अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

## इंधनसाठा मुबलक : कृत्रिम टंचाई केल्यास फौजदारी कारवाई

**● जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचा पंपधारकांना इशारा ●**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील काही पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही पेट्रोलपंप विनाकारण बंद ठेवणे, ग्राहकांना इंधन देण्यास नकार देणे, कृत्रिम तुटवडा निर्माण करणे अशा स्वरुपाच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत.

ही बाब लक्षात घेऊन कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या पंपधारकांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे, असा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिला आहे. जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांच्या निदर्शनास ही बाब आलेली असून याबाबत त्यांनी आदेश काढले आहेत. पेट्रोल पंप विनाकारण बंद ठेवू नये, ग्राहकांना इंधन देण्यास नकार देऊ नये, मर्यादित विक्री करणे किंवा कारणाशिवाय अडथळे निर्माण करणे टाळावे, पेट्रोलपंपाचे कामकाज शासनाने ठरविलेल्या विहित वेळेत नियमितपणे सुरु ठेवावे, पेट्रोलपंपावर दर्शनी भागावर दर फलक स्पष्टपणे दर्शविण्यात यावे, असे या आदेशात नमूद आहे. पेट्रोल/डिझेलचा स्टॉक व विक्रीसंदर्भात पेट्रोलपंपाची तपासणी करण्यात येणार आहे. साठा करुन ठेवणाऱ्या पंपांवर धाडी टाकण्याच्या अनुषंगाने तालुकानिहाय पथक गठित तयार करण्यात येणार आहे.

पाकणी येथील तीनही कंपनीच्या ऑइल डेपो मॅनेजर यांना पेट्रोल व डिझेलचा योग्य पुरवठा सोलापूर जिल्ह्यात करण्यात यावा, कोठेही कमतरता भासणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असेही निर्देश देण्यात आलेले आहेत. तपासणीमध्ये दोषी आढळल्यास नियमानुसार संबंधित पेट्रोलपंप चालकाविरुध्द पेट्रोलियम नियम २००२, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५, भारतीय नागरिक सुरक्षा २०२३ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदीनुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.







## नरसापूर घटनेविरोधात संतापाचा ज्वालामुखी

**● सकल हिंदू समाजाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

नरसापूर येथे घडलेल्या अमानुष घटनेच्या विरोधात सर्वत्र जणू संतापाचा ज्वालामुखी निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने मंगळवार, दि.५ मे २०२६ रोजी सोलापुरातील जिल्हाधिकारी कार्यालयसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

दोषी नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी; या मागणीसाठी विविध सामाजिक संघटना, सर्वपक्षीय राजकीय नेते एकत्र येत एल्गार पुकारला.यातील क्रूरकर्मींना कुठलीही दया दाखवू नये, त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, पीडित कुटुंबाला न्याय व संरक्षण द्यावे, अशा घटना पुन्हा घडू नयेत; यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जोपर्यंत दोषींना कठोर शिक्षा होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरुच ठेवण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आश्वासन प्रशासनकडून देण्यात आले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापालिका सभागृह नेते नरेंद्र काळे, काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे आदींची भाषणे झाली. या आंदोलनात नगरसेविका श्रीकांचना यन्नम, नगरसेवकद्वय राजकुमार पाटील, प्रशांत पुल्ली, बजरंग दलाचे सुधीर बहिरवाडे आदी सामील झाले होते.

**नेमकी घटना काय ?**

- नरसापूर येथे सुमारे ६० वर्षांच्या एका इसमाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.
- ही घटना काही दिवसांपूर्वी घडली असून स्थानिक पातळीवर संताप व्यक्त झाला.
- मुलगी आरोपीच्या ओळखीची/परिचयातील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे (अशा घटनांमध्ये हे अनेकदा दिसून येते).

**पोलिस कारवाई**

- पीडितेच्या कुटुंबाने तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला.
- आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्यावर पॉक्सो अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**राजकीय नेत्यांना सवाल**

अमृता कुलकर्णी आणि अश्विनी कणबसकर याप्रसंगी बोलताना राजकीय नेत्यांना सवाल उपस्थित करत महिलांची सुरक्षा आणि भवितव्य यावर राज्य सरकारने विचार करुन कठोरात कठोर कायदा करावा. त्या नराधमाला फाशी शिक्षा द्यावी अशी मागणी लावून धरली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१४३२

**तुका म्हणे शुध्द जाती । ते मागुनी परतेना ।।**

वाचा ही मानवाला मिळालेली अत्यंत महत्वपूर्ण अशी देणगी आहे. या देणगीचा माणूस बऱ्याचवेळा केवळ स्वार्थासाठी, मोठेपणासाठी उपयोग करतो.



आपल्या वाचेमुळे दुसरा फसला जात आहे, याचा तो विचार करीत नाही. दिलेल्या शब्दाप्रमाणे माणूस वागला तर समोरच्याची फसगत होण्याचे कारण नाही. पण अनेकांची केवळ शब्द फिरविल्यामुळे फसगत झाल्याचे आपण पाहतो. शब्द देणे सोपे आहे, पण त्याचे पालन करणे अवघड आहे. त्यामुळे शब्द देण्याअगोदर माणसाने अनेकवेळा विचार करायला हवा, असे आपण म्हणत असतो. इतरांना बरे वाटावे किंवा स्वत:चे मोठेपण व्हावे किंवा आपला स्वार्थ साधला जावा म्हणूनही लोक शब्द देऊन जातात आणि त्या शब्दाची आठवणही ठेवत नाहीत. पण समाजात असे कांही लोक आहेत की जे कोणत्याही परिस्थितीत दिलेला शब्द पाळल्याशिवाय राहत नाहीत. अर्थात दिलेला शब्द ते फिरवत नाहीत. अशा लोकांबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**तुका म्हणे शुध्द जाती । ते मागुनी परतेना ।।**

तुकाराम महाराजांनी येथे जात हा शब्द उपयोगात आणला आहे. येथे जात म्हणजे मानवाला माणूसकी, मानवता जोडण्यासाठी जे गुण आवश्यक आहेत, त्या सर्वांचे मन:पूर्वक पालन करणारे, असा अर्थ अपेक्षित आहे. आम्ही जातीवंत संत आहोत, म्हणजे संतांसाठी जे गुण लागतात ते सर्व गुण आमच्याकडे आहेत, असा अर्थ आहे. प्रत्येक माणूस माणसासाठी किंवा माणुसकीसाठी आवश्यक असणारे सर्व गुण जोपासू लागला तर समाजात वाईट कांहीच घडणार नाही. कोणाच्या सुनांना आत्महत्या कराव्या लागणार नाहीत. हुंडाबळी, चोऱ्या, लुटमार, लबाडी, फसवणूक कांहीच होणार नाही. माणूस माणसासाठी आवश्यक असणारे गुण जोपासत नाही, म्हणूनच मानवाला शोभणार अशी कृती माणसाकडून झाल्याचे आपण पहातो. कधी-कधी माणसापेक्षा जनावरे बरी म्हणण्याची वेळ आपल्यावर येते. कारण माणूस अत्यंत वाईट, क्रूर अशी कृती करून जातो. मानवी जीवनात सकारात्मक दृष्टीला जेवढे महत्व आहे, तेवढेच महत्व दिलेला शब्द पाळण्याला आहे. शब्द फिरवणे म्हणजे एखाद्याच्या जीवनात फार मोठा अडसर निर्माण करणे होय. आम्ही संत श्री ज्ञानोबा-तुकोबांच्या मार्गदर्शनाखाली वावरणारे असल्याने आपल्याकडून दिलेला शब्द फिरवला जाता कामा नये. लोक संत, सज्जनांना किंवा भगवंतालाही दिलेला शब्द पाळत नाहीत. स्वार्थ साधला म्हणजे शब्द विसरलाच, अशा पध्दतीने लोक वागतात. अशा लोकांत आपला क्रमांक लागता कामा नये. थोडक्यात आपण एकतर शब्दच देऊ नये आणि दिलाच तर तो पाळल्याशिवाय राहू नये. अशाने आपल्या आनंदलहरी वाढतील. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. ६ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. चतुर्थी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- मूळ (१५.५२)**
**योग - सिध्द (२५.११)**
**करण - कौलव (२१.०३)**
**राहू काल : बुधवार**
**दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष :**
**१९५४: रॉजर बॅनिस्टर यांनी १ मैल अंतर ४ मिनिटांपेक्षा कमी वेळेत धावून विश्वविक्रम केला.**
**१९८३: डॉल्फ हिटलर यांच्या डायरीतील नोंदी खोट्या असल्याचे सिद्ध झाले.**
**जन्म :**
**१८५६: सिग्मंड फ्रॉइड (ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ)**
**१८६१: मोतीलाल नेहरू (भारतीय स्वातंत्र्यसैनिक)**

# पाणीटंचाईवर मात करण्यासाठी 'जलतारा' ठरणार प्रभावी

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

पाणी संवर्धनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोलापूर जिल्ह्यात जलतारा शेतखड्डा प्रात्यक्षिक हा प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे व भूजल पातळी वाढवणे हा आहे. दरम्यान, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी 'जलतारा' प्रभावी ठरणार असल्याचा आत्मविश्वास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना आज (दि.४) व्यक्त केला.

चालू वर्षात एल-निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील शेतीवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पावसाचे उशिरा आगमन, पावसातील खंड, तसेच एकूण पर्जन्यमानात घट यामुळे खरीप हंगामातील पेरणी उशिरा होण्याची किंवा पुन्हा पेरणी (पुनर्लागवड) करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात पाणी संवर्धनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोलापूर जिल्ह्यात जलतारा शेतखड्डा प्रात्यक्षिक हा प्रभावी उपक्रम राबविण्यात




येत आहे. तसेच चिबड युक्त जमिनीमध्ये जलताराचे काम केल्यास पाण्याचा निचरा होऊन जमिन चिबडयुक्त होण्याचे प्रमाण कमी होऊन पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्याकरीता जलतारा हा महत्वपूर्ण व परिणामकारक उपाय आहे. पावसाळ्यात शेतातून वाहून जाणारे पाणी योग्य ठिकाणी अडवण्यासाठी शेतात साधारण ५५ फूट रुंद व ६ फूट खोल शोषखड्डे तयार करून त्यामध्ये दगड, खडी व वाळू भरून नैसर्गिक फिल्टर तयार केला जातो. त्यामुळे पाणी जमिनीत मुरून भूजल पुनर्भरणास मोठी मदत होते. तसेच चिबडयुक्त जमिनीत पाण्याचा निचरा सुधारतो. परिणामी विहिरी, बोअरवेल व पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते. शेतकऱ्यांनी संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी, उपकृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज पेटी ठेवण्याच्या सुचना सर्व तालुका कृषी अधिकारी यांनी देण्यात आलेल्या आहेत. तसेच ग्रामपंचायत स्तरावर अर्ज पेटी उपलब्ध नसल्यास संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना कळवावे असे आवाहन भोसले यांनी केले आहे.

**या उपक्रमाचे असे होणार सकारात्मक परिणाम**
- भूजल पातळीत सुमारे १४ फूटपर्यंत वाढ
- पिकांच्या उत्पादनात सुमारे ४२ टक्क्यांनी वाढ
- शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सुमारे १२० टक्क्यांनी वाढ
- पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणा

## नरसापूर अत्याचारातील आरोपीला व्हावी शिक्षा

### शहर भाजपाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथे तीन वर्षीय बालिकेवर झालेल्या अत्याचार प्रकरणी आरोपीला कठोर आणि कडक शिक्षा करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी सोलापूर शहरातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोमवारी निवेदनाद्वारे करण्यात आली.

याप्रसंगी भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, उपम हापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे यांची प्रमुख उपस्थिती होती.



याबाबतचे निवेदन उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर यांनी स्वीकारले. याबाबत भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर म्हणाल्या, तीन वर्षांच्या निरपराध बालिकेवर अत्याचार करून झालेली हत्येची घटना अत्यंत संतापजनक आणि मानवतेला काळीमा फासणारी आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. अशा अमानुष घटनांमुळे समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवून आरोपीस भारतीय दंड संहितेनुसार अधिकाधिक शिक्षा व्हावी तसेच पीडित कुटुंबास तत्काळ आर्थिक मदत, संरक्षण व मानसोपचार सहाय्य उपलब्ध करून द्यावे, अशी म ागणीही भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी केली.

यावेळी भाजपाचे सरचिटणीस डॉ. शिवराज सरतापे, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, महेश देवकर, शहर चिटणीस रवी भवानी, बजरंग कुलकर्णी, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष राजू हिबारे, अल्पसंख्यांक महामंत्री आदम शेख, व्यापारी आघाडी अध्यक्ष लक्ष्मीकांत खंडेलवाल, विश्वनाथ प्याटी, विजय धोत्रे, ओंकार होमकर उपस्थित होते.

## झेडपीच्या सर्वसाधारण सभेत अंदाजपत्रकावर होणार चर्चा

### १५ मे रोजी सभा; दिव्यांग कल्याण, रस्ते विकासाचे विषय अजेंड्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

जिल्हा परिषदेची पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, १५ मे रोजी दुपारी दोन वाजता जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आली असून या सभेत जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नासह अंदाजपत्रकावर चर्चा करण्यात येणार आहे. याशिवाय दिव्यांग कल्याण, रस्ते विकासासह विविध विकासकामांशी संबंधित ११ महत्त्वाचे विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले आहेत.



सभेच्या अजेंड्यानुसार, १६ मार्च रोजी झालेल्या मागील सभेचा इतिवृत्तांत कायम करणे हा पहिला विषय आहे. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सन २०२५-२६ च्या सुधारित व २९२६-२७ च्या मूळ अंदाजपत्रकास मंजुरी देण्याचा महत्त्वाचा विषय मांडण्यात येणार आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय व दिव्यांग कल्याण योजनांवर विशेष भर देण्यात आला असून, २० टक्के मागासवर्गीय आणि ५ टक्के दिव्यांग कल्याण निधीतून वैयक्तिक योजना राबविण्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच ग्रामीण भागातील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी शिलाई मशीन व इतर योजना मंजूर करण्याबाबतही निर्णय होणार आहे. याशिवाय, धोकादायक इमारती पाडण्यास मंजुरी, जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत विविध रस्ते कामांना मान्यता, तसेच पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील रस्त्यांचे दर्जो न्नतीकरण यासंदर्भातील विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले आहेत.

महिला व बालकल्याण विभागांतर्गत अंगणवाड्यांना शैक्षणिक व भौतिक साहित्य पुरवठा करण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्तावही या सभेत मांडला जाणार आहे. तसेच २०२६-२७च्या वार्षिक योजनेत अंगणवाडी इमारत बांधकाम व दुरुस्ती कामांना मंजुरी देण्याचा मुद्दा देखील महत्त्वाचा ठरणार आहे. याशिवाय, जिल्ह्यातील विविध रस्ते विकास योजनांचा समावेश, तसेच २०२५-२६ अंतर्गत दुरुस्ती व खरेदीसाठी निविदा मंजुरी या विषयांवरही चर्चा होणार आहे.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेचे विषयही सभेत मांडले जाणार असल्याने या सभेकडे लक्ष लागले आहे.

### भारत विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

मजरेवाडी येथील भारत उर्दू व मराठी विद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष रजाक बागवान होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वजीर गफूर रंगरेज व अय्युब हुसेनसाब शेख उपस्थित होते. यावेळी तमन्ना मकानदार या विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मुख्याध्यापिका एस.एम. अत्तार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन जे.एच. हवालदार यांनी केले तर आभार एस.के. सरसंबे यांनी मानले.

## जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचचे वार्षिक पुरस्कार जाहीर

### २५ मे रोजी सोलापुरात वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच वतीने सन २०२५-२६ चे प्रतिष्ठित वार्षिक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यावर्षीचा पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात संपन्न होणार आहे. या पुरस्काराचे वितरण श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे सोलापूर जिल्हाप्रमुख पद्माकर कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्कारांचे सन्मानपूर्वक वितरण करण्यात येणार आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील पाच मान्यवरांना त्यांच्या विशेष कार्याबद्दल गौरवण्यात येणार आहे यात प्रा. डॉ. शिवाजी शिंदे यांना स्व. डॉ. मीर इसहाक शेख स्मृति पुरस्कार येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव म्हणून कार्यरत असून त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक स्तरावर उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यासाठी, तसेच वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर आणि हिराचंद नेमचंद कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील प्रा.भीमगोंडा रामगोंडा पाटील यांना स्व. सुमतीबाई येळेगावकर स्मृति पुरस्कार डॉ. काटीकर आणि प्रा. पाटील यांनी शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रासोबतच सामाजिक



डॉ. शिवाजी शिंदे | डॉ. नरेंद्र काटीकर | वंदना कुलकर्णी | ओमप्रकाश बारड | प्रा. भीमगोंडा पाटील

कार्यात स्वतःला झोकून दिले आहे.

त्याबद्दल हे पुरस्कार दिले जाणार आहेत. तसेच ज्येष्ठ कवयित्री वंदना कुलकर्णी यांना स्व. रंगनाथ लोहार साहित्य पुरस्कार, हा साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदाना असून. त्यांनी त्यांच्या कवितांमधून उमटणारे सामाजिक भान आणि शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. आणि ओमप्रकाश बारड यांना स्व. बाबुराव धुमाळ स्मृति आदर्श कामगार पुरस्कार दिला जाणार असून ते व्यावसायिक क्षेत्रात काम करत असतानाच टेलरिंग व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी समाजाप्रती असलेली आपली बांधीलकी जपत आदर्श सेवा बजावली आहे. त्याबद्दल हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. पुरस्कार सोहळ्यास मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंचचे अध्यक्ष फैय्याज शेख आणि कार्यवाह अरुण धुमाळ यांनी केले आहे.

## जि.प. स्थायी समितीची उद्या सभा; विकामकामे, खर्च मंजुरीवर होणार चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची अत्यंत म हत्वाची सभा गुरुवार, ८ मे रोजी दुपारी २ वाजता जिल्हा परिषदेमधील शिवरत्न सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या सभेचे अध्यक्षस्थान स्थायी समितीचे अध्यक्ष दीपक वैद्य भूषवणार असून, विविध प्रशासकीय व विकासात्मक विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

या बैठकीत सर्वप्रथम मागील स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्याचा विषय मांडण्यात येणार आहे. त्यानंतर शासनाकडून प्राप्त झालेल्या विविध महत्त्वपूर्ण परिपत्रकांचे व निर्णयांचे वाचन करून त्याची अधिकृत नोंद घेतली जाणार आहे. यामुळे शासनाच्या नव्या धोरणांची अंमलबजावणी आणि स्थानिक पातळीवरील नियोजन अधिक स्पष्ट होणार आहे.

सभेतील एक प्रमुख मुद्दा म्हणजे जिल्हा परिषद अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांशी संबंधित कामांची सद्यस्थिती तपासून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यात येणार आहेत. यामुळे कामांची गती वाढविणे आणि दर्जा उंचावणे यावर भर दिला जाणार आहे.

तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर झालेल्या खर्चास मान्यता देण्याबाबतही सविस्तर विचारविनिमय होणार आहे. विविध योजनांवर झालेल्या आर्थिक तरतुदींचा आढावा घेऊन निधीच्या योग्य वापरावर भर दिला जाणार आहे. याशिवाय जिल्हा ग्रामीण विकास निधीअंतर्गत करण्यात आलेल्या खर्चाची माहिती सादर करण्यात येणार असून, त्या खर्चास मंजुरी देण्याचा विषयही चर्चेत राहणार आहे. ग्रामीण भागातील विकासाला चालना देण्यासाठी या निधीचा प्रभावी वापर कसा होईल यावरही म ार्गदर्शन होण्याची शक्यता आहे. एकूणच, या सभेमध्ये जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या बैठकीकडे प्रशासनासह लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

### 'मि. फिट'कडून समर फिटनेस मेगा ऑफर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर शहरातील होटगी रोड, गांधीनगर येथील मि. फिट फिटनेस शोरूम मध्ये उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर खास आकर्षक ऑफर जाहीर करण्यात आली आहे. घरबसल्या आरोग्य जपण्याची उत्तम संधी म्हणून या ऑफरकडे ग्राहकांचा मोठा प्रतिसाद अपेक्षित आहे.

या ऑफरअंतर्गत सर्वाधिक मागणी असलेल्या ट्रेडमील मशीनवर तब्बल २०% ते ४०% पर्यंत सवलत देण्यात येत आहे. तसेच वजन कमी करण्यासाठी उपयुक्त इलिप्टीकल सायकल, गुडघेदुखी कमी करण्यास मदत करणारी आणि फिटनेससाठी



फायदेशीर मॅग्नेटिक सायकल, तसेच संपूर्ण शरीराचा व्यायाम करणाऱ्या होम जिम सेटअपवरही विशेष सवलती उपलब्ध आहेत. मि. फिट मध्ये घरगुती व्यायाम साहित्याबरोबरच कमर्शियल जिम, सोसायटी जिम, शैक्षणिक संस्था, हॉटेल व रिसॉर्टसाठी ब्रँडेड फिटनेस इक्विपमेंटची संपूर्ण रेंज उपलब्ध आहे. केवळ विक्रीच नव्हे तर उत्तम सर्व्हिस आणि मेंटेनन्स सुविधा हे या शोरूमचे खास वैशिष्ट्य आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी सुलभ फायनान्स सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्यामुळे आता फिटनेसकडे वाटचाल करणे अधिक सोपे झाले आहे. ही आकर्षक ऑफर दि. ५ मे ते १५ मे या कालावधीत मर्यादित स्वरूपात उपलब्ध असून, सोलापूरकरांनी या सुवर्णसंधीचा नक्कीच लाभ घ्यावा, असे आवाहन मि. फिट तर्फे करण्यात आले आहे. आजच भेट द्या - आणि आपल्या फिटनेस प्रवासाची सुरुवात करा.

# लोकशाही दिनात ४९ तक्रारी अर्ज दाखल

### अधिकाऱ्यांकडून तक्रारींची माहिती देण्यास टाळाटाळ

### जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना सूचना करण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

महाराष्ट्रात लोकशाही दिन हा दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी साजरा केला जातो. जर त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असेल, तर तो पुढील कामकाजाच्या दिवशी आयोजित केला जातो. दरम्यान, सोलापूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात ४ मे रोजी महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन झाला.

मात्र या लोकशाही दिनी जिल्ह्यातून किती तक्रारी आल्या; पूर्वीच्या पेंडिंग तक्रारी किती? किंवा किती तक्रारींचा जागेवर निपटारा झाला याची माहिती प्रसार माध्यमांना देण्यास संबंधित अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचा प्रकार सोमवारी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात दिसून आला. यामुळे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी याबाबत लक्ष द्यावे आणि जनहिताच्या बातम्यांना वेळीच प्रसिध्दी देण्यासाठी अधिकाऱ्यांना सुचना कराव्यात, इतकीच अपेक्षा वाटते.

लोकशाही दिनाच्या उपक्रम ांतर्गत जिल्ह्यातील नागरिक आपल्या समस्या आणि तक्रारी थेट शासकीय अधिकाऱ्यांसमोर मांडू शकतात. लोकशाही दिनाचे आयोजन विविध स्तरांवर केले जाते. मात्र या दिवशी संबंधित सर्व अधिकारी उपस्थित राहत नाहीत. यासाठी मध्यंतरी आरडीसी अभिजित पाटील यांनी सर्व विभागप्रमुखांनी लोकशाही दिनास उपस्थित राहण्याच्या कडक सुचना दिल्या होत्या. तरीही अनेक अधिकारी दांडी म ारत असल्याची माहिती मिळत आहे. या लोकशाही दिनी जिल्हाधिकारी कार्तिकेयन आणि आरडीसी अभिजित पाटील रजेवर असल्याने महसूल उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी नागरिकांच्या तक्रारी जाणून घेतल्या. यामध्ये तब्बल ४९ तक्रारी आल्या होत्या. यामुळे दैनिक तरूण भारतच्या माध्यमातून त्याच दिवशी उपजिल्हाधिकारी कसेकर यांची भेट घेवून याबाबत विचारणा केल्यावर याची प्रेसनोट सायंकाळपर्यंत वॉटस्‌ॲपवर मिळून जाईल, असे सांगण्यात आले. मात्र दुसऱ्या दिवशीपर्यंत याची माहिती देण्यात आली नाही. यानंतर दुसऱ्या दिवशी याबाबत म हसूल उपजिल्हाधिकाऱ्यांना फोन केल्यावर या लोकशाही दिनाची प्रेसनोट नाही तर अर्जाची संख्या त्यांनी वॉटस्‌ॲपवर दिली. खरं तर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली हा लोकशाही दिन आयोजित केला जातो. ते नसतील तर आरडीसी घेतात आणि काल दोघेही इतर कामानिमित्त परगावी असल्याने महसूल उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी हा कार्यक्रम पार पाडला. तर तहसील कार्यालय आणि पंचायत समिती स्तरावर त्या-त्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लोकशाही दिन झाला. म हानगरपालिका/नगरपालिकेतही आयुक्त किंवा मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत तक्रारींचे निवारण केले जाते.

लोकशाही दिनी अधिकारीच उपस्थित राहत नसतील तर लोकशाही दिनातील तक्रारींचा निपटारा कसा होणार? लोकांच्या मागण्या काय आहेत? शासनाने ठरवून दिलेल्या उपक्रमाचा नागरिकांना कसा फायदा होणार? असे सवाल उपस्थित होत आहेत. तरी लोकशाही दिनी संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व सामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकून घ्याव्यात आणि त्याचे निराकरण जागेवरच करण्याचा प्रयत्न व्हावा, अशी सामान्य नागरिकांची इच्छा आहे.

सोमवारी आलेल्या तक्रारी अर्जाम ध्ये एकूण ४९ अर्ज आहेत. यामध्ये ग्रामीण पोलिस अधीक्षक ६ आणि जिल्हा परिषद सोलापूर विरोधात ५ तक्रारी अर्ज आहेत. या खालोखाल जिल्हा पुनर्वसन कार्यालय ३, अधीक्षक अभियंता बांधकाम विभाग ३, महसूल शाखा ३, अस्थापना ३ यासह इतर कार्यालयातील १ व २ अशा तब्बल ४९ तक्रारी दाखल आहेत. आता यातील किती तक्रारींचा निपटारा झाला? याचीही माहिती माध्यमांना कळण्याची गरज आहे.

**माध्यमांना माहिती दिली जाईल: आरडीसी अभिजीत पाटील**

लोकशाही दिनाच्या माहितीबाबत निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधल्यावर त्यांनी सांगितले की, आमच्याकडे इतर कामांची जबाबदारी असल्याने परगावी होतो मात्र भविष्यातील लोकशाही दिनाची इत्यंभूत माहिती माध्यमांना दिली जाईल.

### पाणी समजून फिनेल पिल्याने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ मे-**

मार्केट यार्डमध्ये कामावर पाणी समजून फिनेल पिल्याने एका ७० वर्षीय वृद्ध महिलेचा सोमवारी सायंकाळी मृत्यू झाला. शरणम्मा मनोहर धुळे (वय ७० वर्ष, राहणार आशा नगर, एमआयडीसी सोलापूर )असे त्या मयत महिलेचे नाव असून त्या येथील सिद्धेश्वर मार्केट यार्ड मध्ये कामावर असताना पाणी समजून फिनेल पिले. याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना सून अंबिका धुळे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात सकाळी दाखल केले असता महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

**अज्ञात वाहनाच्या धडकेत रस्ता क्रॉस करणारा इसम ठार**

**सोलापूर** - अज्ञात वाहनाच्या धडकेत एक रस्ता क्रॉस करणारा इसम जागीच ठार झाल्याची घटना मोहोळ तालुक्यातील कामती येथे सोमवारी मध्यरात्री घडली . शहाजान गफूर मुजावर ( वय ४२ वर्ष , रा . कामती ) असे मयत व्यक्तीचे नाव आहे . ते सोमवारी म ध्यरात्री साडेअकरा वाजता कामती येथील राजमाता ढाब्या जवळील रस्ता ओलांडत होते. त्यावेळी अज्ञात वाहन त्यांना धडक देऊन तसेच सुसाट वेगाने निघून गेले. या धडकेत शहाजान हे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले. त्यांना येथील शासकीय रुग्णालयात भाऊ सलीम मुजावर यांनी आज मंगळवारी पहाटे दीड वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### छत्रपती शिवाजी प्रशालेत महाराष्ट्र दिन साजरा

**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर येथील छत्रपती शिवाजी प्रशाला व नाईट महाविद्यालयातर्फे १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त प्राचार्य डॉ. नितीन मोटे व कर्मचारी दत्ता सुतार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे हे होते. संस्थेचे संचालक विनायक पाटील, प्रभाकर खंडाळकर, अशोक चव्हाण, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, उषा गोखळे, पर्यवेक्षक श्रीपती जगदाळे, किरण देशमुख, सुरेश जगताप, भानुदास घंदुरे उपस्थित होते.



### शुभांगी कांबळेचा एकता मंचकडून गौरव

**पंढरपूर, दि. ५ मे-**

वसंतराव काळे प्रशाला व ज्युनिअर कॉलेज (वाडीकोरली धोंडेवाडी) येथील कला शाखेची विद्यार्थिनी शुभांगी कांबळे हिने मिळवलेल्या यशाबद्दल सोमवार, ४ मे रोजी एकता महिला मंच, खेड भाळवणी यांच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. शुभांगी कांबळेने कला शाखेमध्ये ८१ टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाने धोंडेवाडी आणि खेड भाळवणी परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे. एकता महिला मंचतर्फे शुभांगीला शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि प्रेरणादायी पुस्तक भेट देण्यात आले. आपल्या यशाचा आनंद व्यक्त करताना शुभांगीने सर्वांना पेढा भरवून सर्वांचे आशीर्वाद घेतले. मीनाक्षी साळुंखे, प्रियंका दामोदरे, सुरेखा साळुंखे, वनिता कांबळे, उज्वला शिंदे यांच्यासह अन्य महिला सदस्यांनी उपस्थित राहून शुभांगीचे अभिनंदन केले. प्रास्ताविक, सूत्रसंचालन प्रियंका दामोदरे यांनी केले. मीनाक्षी साळुंखे यांनी आभार मानले. संपूर्ण पंढरपूर तालुका आणि शैक्षणिक स्तरातून शुभांगीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### कासेगावात शिवा काशीद यांची जयंती साजरी

**कासेगांव, दि. ५ मे-**

वीर शिवा काशिद यांची जयंती पंढरपूर तालुक्यातील कासेगांव मध्ये मंगळवारी (ता.५) साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजीमहाराजांचा निष्ठावंत मावळा विर शिवा काशीद यांच्या जयंती निमित्त प्रसिद्ध व्याख्याते प्रदिप कदम (पुणे) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दरम्यान विरशिवा काशीद यांच्या प्रतिमेचे पूजन व्याख्याते कदम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर नाभिक समाज बांधवांच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमास ग्राम पंचायतीचे आजी माजी सदस्य, विविध पक्षाचेनेते,ग्रामस्थ व सकल नाभिक समाजबांधव उपस्थित होते.



### एमआयटी ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे बारावी परीक्षेत यश

**पंढरपूर, दि. ५ मे-**

तालुक्यातील वाखरी येथील माईर्स एमआयटी पुणे संचालित विश्वशांती गुरुकुल ज्युनियर कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल लागला. वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के तर विज्ञान शाखेचा निकाल ९७.८२ टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेतील पियुष साळुंखे याने ९६ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. पियुष साळुंखे याने अकाउंट्स व गणित विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवले. सायली ढेकळे हिने ९३.६७ टक्के गुण मिळवत द्वितीय तर तन्वी खपाले हिने ८९ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. पारस शेठ ८७.१७ टक्के, सोहम बहुरूपी ८७ टक्के, प्रवीण चौधरी ८७ टक्के, ओंकार लगड ८६.३३ टक्के आणि परिनिता आवताडे ८६ टक्के यांनीही विशेष प्राविण्य मिळवले. हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी, प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ तसेच शिक्षक व व्यवस्थापनाने सर्व यशस्वी विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले आहे. महाविद्यालयाने नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला असल्याचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी सांगितले.

### घराचे कुलूप तोडून ५१ हजार लंपास

**सोलापूर, दि. ५ मे-**

बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम मिळून ५१ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेले. जुळे सोलापूर भागात ही घटना नुकतीच घडली. दरम्यान या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिनाक्षी राजकुमार चव्हाण (रा. शिवरत्न नगर, जुळे सोलापूर) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादी या दि. २५ ते २७ एप्रिल दरम्यान घराला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या. या काळात चोरट्याने बंद घराचा कडी कोयंडा व कुलुप तोडून घरात प्रवेश केला. कपाटातील ५ ग्रॅम वजनाची कर्णफुले, २० ग्रॅम वजनाचे चांदीचे पैंजण व रोख रक्कम असा मिळून एकुण एकुण ५१ हजार रुपय किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### अपघात पहायला गेल्यानंतर लोखंडी रॉड, हॉकी स्टीक व लाथाबुक्याने मारहाण


**सोलापूर, दि. ५ मे-**

घराजवळ झालेला अपघात पाहताना लोखंडी रॉड, हॉकी स्टीक व लाथा बुक्क्याने एकास मारहाण करण्यात आली. याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमेश शंभु बनसोडे (वय ३६, रा. १० अशोक नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २६ एप्रिल रोजी दुपारी घराजवळ अपघात झाल्याचे पाहण्यासाठी मित्र राहुल शिंदे, मल्लेश हैनाळे यांच्यासोबत तेथे गेले असता त्यांना स्कुटर (क्र. एम एच १३ ई आर ८१८७) वरील चार जणांनी लोखंडी रॉड, हॉकी स्टीक, लोखंडी बांबू व लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार जाधव हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

# शिक्षक भरती : ३१ हजार उमेदवारांना नोकरीची आशा

## शिक्षण विभागाचे शाळांना आदेश | ३१ मे पर्यंत रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करा

**● खाजगी आस्थापना, जिल्हा परिषद शाळा दिसणार पोर्टलवर**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

राज्यात लवकरच शिक्षक भरती होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसह खासगी शैक्षणिक संस्थांतील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी 'पवित्र पोर्टल'वर जाहिरात नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार १ ते ३१ मे या कालावधीत शाळांच्या व्यवस्थापनांना रिक्त पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी ही परीक्षा गेल्या वर्षी पार पडली. परीक्षेसाठी २ लाख २८ हजार उमेदवारांनी नोंदणी केली. तर २ लाख ११ हजार ३०८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. यातील १ लाख ७० हजार १०८ उमेदवारांनी स्व-प्रमाणपत्रे पूर्ण केली. मे २०२६ पर्यंत रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेऊन भरती होणार आहे. पहिली ते बारावीपर्यंतच्या सर्व गटांमधील रिक्त पदांसाठी जाहिरात देता येईल. जाहिरात देण्यापूर्वी संस्थांना आपली बिंदूनामावली मागासवर्गीय कक्षाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. रिक्त पदांची माहिती भरल्यानंतर ती संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्यता दिल्यानंतरच जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती आहे. वर्षभराची प्रतीक्षा संपली आणि पवित्र पोर्टल शिक्षक भरती नोंदणी प्रक्रिया सुरू झाली. पहिली ते बारावीच्या सर्व आस्थापनांनी पोर्टलवर नोंदणी करावरी, असे आवाहन केले आहे.

> “जिल्ह्यातील ३१ हजार उमेदवारांनी पवित्र पोर्टलची परीक्षा दिली. अशा उमेदवारांना न्याय कधी मिळणार किंवा त्यांना ह्या पवित्र पोर्टलवर शाळा उपलब्ध होतील अशी आशा लागून राहिलेली आहे.
>
> **- प्रशांत शिरगुर**
> राज्य उपाध्यक्ष स्पर्धा परीक्षा तथा पवित्र पोर्टल शिक्षक भरती

> “नव्या शैक्षणिक वर्षात नवे शिक्षक विद्यार्थ्यांना मिळावेत म्हणून आझाद मैदानात आंदोलन मोर्चे काढले. वर्षभराची प्रतीक्षा संपली आणि पवित्र पोर्टल शिक्षकभरती नोंदणी प्रक्रिया सुरू झाली. पहिली ते बारावीच्या आस्थापनानी पोर्टलवर नोंदणी करावी.
>
> **- प्रा.बालुशा माने,**
> - शिवयुनिटी फाऊंडेशन

**घरकुल लाभार्थ्यांचा प्रश्न ऐरणीवर**

## मोहोळमध्ये वाळू वितरणात अडथळे; डिकसळ येथील वाळू स्थळावर गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे**

मोहोळ तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना शासन नियमानुसार पाच ब्रास मोफत वाळू मिळावी, या मागणीसाठी आज डिकसळ येथील वाळू स्थळावर मोठी गर्दी झाली. पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, कर्मचारी तसेच अनेक लाभार्थी स्वतःची वाहने घेऊन सकाळपासूनच ठिकाणी उपस्थित होते.

मात्र संबंधित तलाठी, ग्राम महसूल अधिकारी आणि मंडल अधिकारी घटनास्थळी गैरहजर राहिल्याने प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत वाळू मिळणे अत्यंत गरजेचे असताना, जबाबदार अधिकारीच अनुपस्थित राहिल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. यासोबतच तहसीलदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

महसूल विभागाने निश्चित केलेल्या याच वाळू स्थळावर चार दिवसांपासून रात्री अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याची माहिती पुढे आली आहे. स्थानिकांकडून ही बाब तहसीलदार मोहोळ तसेच जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या निदर्शनास आणून दिली होती. मात्र, यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप होत आहे.

> “**संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा**
> संबंधित ग्राम महसूल अधिकारी, तलाठी आणि मंडल अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. घरकुल लाभार्थ्यांना तातडीने वाळू उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.
> **- संजीव खिलारे,** गटनेते, मोहोळ पंचायत समिती



**अवैध उत्खननावर संताप**

एकीकडे घरकुल लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काची वाळू मिळण्यात अडथळे येत असताना, दुसरीकडे अवैध उत्खननाला मोकळीक मिळत असल्याचा विरोधाभास दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



## सापटणे तलावासाठी पाणी सोडा; शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ५ मे-**

सापटणे परिसरातील पाण्याच्या तीव्र टंचाईने हजारो हेक्टरवरील ऊस पिक जळू लागली आहेत. शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली असून सापटणे तलावातून पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने केली आहे. त्या पार्श्वभूमीवर आज उजनी धरण उपविभागीय अभियंता, टेंभुर्णी यांना शेतकऱ्यांनी तातडीचे निवेदन दिले.

सापटणे, तांबवे, वेगेगाव या गावांतील हजारो हेक्टरवरील ऊस पिक जळू लागल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सध्या सापटणे तलाव पूर्णपणे कोरडा पडला असून गावकरी व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे. शेतकऱ्यांनी पाणीपट्टी भरूनही शासनाकडून पाणी सोडले जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. ही बाब शेतकऱ्यांवर उघड अन्याय असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. भाजप ॲग्रीकॉस किसान मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तसेच तांबवे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजा खटके-पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा प्रतिनिधी मंडळाने उपविभागीय अभियंत्यांची भेट घेऊन निवेदन दिले. निमगाव तलावातून ओव्हरफ्लो पाणी तसेच -२ शिडशिंगे व -४ पिंपळनेर येथून मोठ्या दाबाने पाणी सोडून सापटणे तलाव तातडीने पूर्ण क्षमतेने भरून द्यावा, अशी मागणी निवेदनात केली आहे. मागणीची तातडीने दखल न घेतल्यास हजारो शेतकऱ्यांसह उजनी धरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. संभाव्य परिस्थितीस शासन जबाबदार राहील, असा ठाम इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

### उसने पैसे परत मागितल्याने डोक्यात घातली फरशी

**सोलापूर :** उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून एका तरुणाला शिवीगाळ करून डोक्यात फरशीने मारून जखमी केले. विजापूर नाका पोलीस ठाण्यात याप्रकरणी एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. रंगनाथ तुकाराम पवार (रा. कुमठे तांडा, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत काशिनाथ बाबू राठोड ( रा. कुमठे, ता. उत्तर सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे दि. ३ मे रोजी रात्री १० वा च्या सुमारास आरोपीच्या घरी जावून उसने पैसे परत मागितले. याचा राग आल्याने आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन हातानी मारहाण केली व फरशीचा तुकडा डोक्यात मारुन जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार बर्हिजे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## संत शिरोमणी चोखाबा महाराज स्मृतीदिन सोहळयानिमित्त विविध कार्यक्रम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.५ मे-**

श्री संत शिरोमणी चोखोबा महाराज यांचा ६८८ वा स्मृतीदिन सोहळा मंगळवेढा येथे मंगळवार दि. ५ मे ते गुरुवार दि. ७ मे या कालावधीत साजरा होत असल्याची माहिती संयोजक जयराज शेंबडे यांनी दिली. स.स. रत्नाकर महाराज (तनाळी मठ) यांचे शिष्य ह.भ.प. कृष्णा रघुनाथ शेंबडे यांच्या शुभाशिर्वादाने या सोहळयाची सुरुवात मंगळवार दि.५ मे रोजी सकाळी ९.०० वा. दिंडी प्रदक्षिणा सोहळयाने झाली.

श्री संत दामाजी मंदिर ते संत शिरोमणी चोखोबा महाराज समाधी मंदिरापर्यंत हा सोहळा होईल. सकाळी १०.०० वा. आमदार समाधान आवताडे व स.स. रत्नाकर महाराज यांचे शिष्य श्री स.स. दाजी महाराज (तनाळी मठ) यांच्या हस्ते विणा पूजन झाले. सकाळी ११ ते दुपारी २ या काळात आसावरी महिला भजनी मंडळ तसेच काशीविश्वेश्वर महिला भजनी मंडळांचे संगीत भजन झाले. दुपारी २ ते सायंकाळी ६ पर्यंत सामुहिक संगीत भजन झाले. सायंकाळी ८ ते रात्री १० हभप सुधाकर इंगळे महाराज यांचे कीर्तन झाले. बुधवार दि. ६ मे रोजी सकाळी ९ वा. श्रीराम महिला भजनी मंडळ,अखिल भाविक भजनी मंडळ, श्री संत कान्होपात्रा महिला भजनी मंडळ,श्री संत मोहनीबुवा भजनी मंडळ,मंगळवेढा यांचे संगीत भजन होईल. सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत हभप महादेव यादव व सहकारी मारापूर यांचे संगीत भजन होईल. रात्री ८ वा. गोपाळपूरच्या ह.भ.प.चंदाताई तिवाडी यांचे भारूड होईल. गुरुवार दि.७ मे रोजी सकाळी ८ वा. श्री संत शिरोमणी चोखोबा महाराज यांच्या समाधीस नगराध्यक्षा सुनंदा आवताडे यांच्या हस्ते भक्तीमय व मंगलमय वातावरणा महाअभिषेक सोहळा होईल. सकाळी ११ वा. श्री संत चोखोबा महाराज समाधी स्मृतीदिन सोहळयानिमित्त संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे सोळावे वंशज हभप निवृत्ती महाराज नामदास (पंढरपूर) यांचे किर्तन व समाधीस पुष्पवृष्टी होईल. व दुपारी १ वा.महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होईल. संपूर्ण भजनी मंडळाच्या कार्यक्रमाचे हभप अरूण शिवशरण यांनी नेटके नियोजन केलेले आहे.

### माहेरहून पैसे आणण्याच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ

**● कलबुर्गी येथील सहा जणांवर गुन्हा दाखल ●**

**सोलापूर, दि. ५ मे-**

हॉटेलच्या नूतनीकरणासाठी माहेरून दहा लाख रुपये आण म्हणून शारीरिक व मानसिक त्रास दिला. तसेच विवाहितेला माहेरी हाकलून दिल्याप्रकरणी कलबुर्गी येथील सहा जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिल सिंदगी, शिवलिला सिंदगी, महारुद्रप्पा सिंदगी, विरेश सिंदगी, सुनिता किरण हुंपली आणि अनिता सुनिल शंकर (रा. तोटप्पा चाळ, स्टेशन बझार, कलबुर्गी, कर्नाटक) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत मोहिनी अनिल सिंदगी (वय ३३, रा. ६५, रेवणसिध्देश्वर मंदिर कन्नड शाळा, विजापूर रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी मोहिनी सिंदगी या दि. ५ जून २०२१ पासुन ते २ मार्च २०२६ रोजी दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी लग्नात मानपान झाला नाही, तुझ्या आई वडिलांनी लग्नात ब्रँडेड वस्तु दिल्या नाहीत, हॉटेल रिन्युव्हेशनकरीता व सासरी येण्याकरीता माहेरुन दहा लाख रुपये घेवून ये असे म्हणून शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच फिर्यादीस नांदवुन न घेता मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार चव्हाण या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

# रस्त्यावरील मूर्ती कारखान्यामुळे पंढरपूरकरांच्या जीवाशी खेळ

**नगरपालिकेची मात्र गाढ झोप; नागरिकांकडून संताप व्यक्त...**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ मे-**

शहरातील गोपाळपूर रोड, महात्मा फुले चौक, संत पेठ तसेच प्रदक्षिणा मार्ग येथे सुरू असलेला बेकायदेशीर प्रकार आता सरळ शहरातील नागरिकांच्या जीवावर उठला आहे. याचे कारण म्हणजे या भागात काही मूर्तीकारांनी कोणतीही परवानगी न घेता सार्वजनिक रस्ताच स्वतःची खाजगी कार्यशाळा किंवा कारखाने बनवले आहेत. पंढरपूर नगरपालिकेची भूमिका मात्र संशयास्पद आणि शांततेचीच दिसत असल्याचा सूर नागरिकांतून आळविला जात आहे.

अतिक्रमणाच्या या प्रकाराबाबात शहरातील सुज्ञ नागरिकांतून तीव्र प्रतिक्रिया देखील उमटत आहेत. पालिकेने त्वरित या अतिक्रमण केलेल्या मुर्तीकारांवर कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणीही जोर धरीत आहे. विशेष म्हणजे या भागातील रस्त्यावर मुर्तीकारांकडून मोठमोठे दगड, साहित्य आणि अवजड घटक रचून मूर्ती बनवण्याचे काम उघडपणे सुरू आहे. या प्रक्रियेतून निर्माण होणारी सूक्ष्म धूळ हवेत पसरत असून ती थेट नागरिकांच्या श्वासात जात आहे. परिसरातून प्रवास करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला या त्रासाला सामोरे जावं लागत आहे. विशेषतः लहान मुले तसेच वृध्दांना या धुळीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मात्र तरीही पालिका प्रशासनाकडून ना तपास, ना कारवाई केली जात आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या मुर्तीकारांच्या अतिक्रमणामुळे रस्त्याची रुंदी मूळ आराखड्यापेक्षा मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. वाहतूक कोंडी, घसरगुंडी आणि कोणत्याही क्षणी होऊ शकणारा अपघात - हीच या मार्गाची आता खरी ओळख बनली आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाने कानाडोळा केला आहे. नियम फक्त कागदावरच आहेत का? परवानगीशिवाय रस्ता ताब्यात घेण्याचे धाडस कसं होत आहे? नगरपालिका इतकी निष्क्रिय कशी? हा प्रकार केवळ अतिक्रमण नाही, तर नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे, असे एक ना अनेक प्रश्न शहरातील सुज्ञ नागरिकांमधून उपस्थित केले जात आहे. या भागातून ये जा करीत असताना जर एखादा भीषण अपघात झाला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? मूर्तीकार की पंढरपूर नगरपालिका? हे जर असेच चालू राहिले तर प्रवाशांचा अपघात हा नक्की आहे, अशा संतप्त प्रतिक्रियाही काही सुज्ञ नागरिकांतून आपसुकच व्यक्त होत आहेत. त्यामुळे पालिका प्रशासन येथील मुर्तीकारांवर काय कारवाई करणार याकडे शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> **ना पालिका, ना मुर्तीकार तयार**
> या भागातून किंवा या भागातील मार्गावरुन रोज मोठ्या प्रमाणावर महाविद्यालयीन विद्यार्थी आणि वारकऱ्यांची ये-जा सुरु असते. पण त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी घेण्यास ना मूर्तीकार तयार आहे ना नगरपालिका तयार आहे. परिणामी कधी एखाद्याचा अपघातात जीव जाईल, याची शाश्वती राहिलेली नाही.



### पिलीवच्या आरती भैसचे बारावीच्या परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि ५ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आरती अजित भैस हिने बारावी परीक्षेत विज्ञान शाखेत ८९.३३ टक्के गुण मिळवित विजयसिंह मोहीते पाटील कॉलेजमध्ये तसेच केंद्रात दुसरा क्रमांक मिळविला. भाजपचे पिलीव शहराध्यक्ष प्रमोद भैस यांची तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पिलीव महिला शहराध्यक्ष पुनम भैस यांची ती पुतणी आहे. आरतीच्या ह्या यशाबद्दल पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लग्न मंडपातून तीन लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

**पंढरपूर, दि. ५ मे-**

शहरातील इसबावी परिसरात असलेल्या श्रीराम मंगल कार्यालय येथे ३ मे रोजी विवाहादरम्यान लग्नमंडपातूनच एका महिलेच्या हातातील पिशवीम धील तीन लाख रुपयाचे सोन्याचे दागिने चोरट्याने लंपास केले. ऐन अक्षतेच्या अगोदरच काही वेळ हा प्रकार लक्षात आल्यामुळे विवाह समारंभात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

इसबावी परिसरात असलेल्या श्रीराम मंगल कार्यालय येथे ३ मे रोजी वैभव जाधव (रा. पंढरपूर) यांचा विवाह समारंभ होता. या विवाह समारंभात नवरी मुलीच्या अंगावर दागिने घालण्यासाठी जाधव यांनी तीन तोळ्याचे सोन्याचे दागिने खरेदी केले होते. हे दागिने एका महिलेकडे ठेवण्यासाठी दिले होते. दरम्यान संबंधित महिलेने हे दागिने प्लास्टिक पिशवीमध्ये ठेवून ती कुलरजवळ लग्न मंडपात बसली होती. दरम्यान चोरट्यांनी पिशवीला खालून ब्लेडने कट करून त्याम धील सुमारे तीन लाख रुपये किंमतीचे नवरीचे दागिने चोरून नेले. दरम्यान याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात मुकुंद चव्हाण (रा. सुस्ते) यांनी गुन्हा दाखल केला आहे. विवाह समारंभात नवरी मुलीचे दागिने चोरीला गेल्यामुळे एकच खळबळ उडाली होती. विवाह समारंभाकडे चोरट्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



## महत्त्वाचे...



### श्री मार्कंडेय हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक सुतार, राठोड यांचा सेवापूर्ती समारंभ

**सोलापूर, दि. ५ मे-**

कुंभारी येथील श्री मार्कंडेय हायस्कूलमधील ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय सुतार आणि कर्मचारी बाबू राठोड यांचा सेवानिवृत्तीनिमित्त नुकताच निरोप समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी होते. दोन्ही सत्कारमूर्तींचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक पंचय्या स्वामी यांनी सुतारसर आणि राठोड यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्वभावाचे कौतुक केले. पर्यवेक्षिका सुमन बिराजदार यांनी संस्थेच्या संस्कारांमुळेच शिक्षकांची प्रगती झाल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी मुख्याध्यापक अमोगसिद्ध कुंभार, मल्लिकार्जून पाटील व सर्व शिक्षक-कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन विनायक चित्रावकर यांनी केले, तर यल्लालिंग बिराजदार यांनी आभार मानले.



### वीज कंत्राटदारांचे कामबंद आंदोलन; आजपासून देखभाल ठप्प करणार

**बार्शी दि.५ मे -**

महावितरणच्या मनमानी कारभारा विरोधात आणि थकित बिलांच्या प्रश्नावरुन सोलापूर जिल्हा इलेक्ट्रिकल कंत्राटदार असोसिएशनने आक्रमक पवित्रा घेतला आहे. ६ मे पासून जिल्ह्यातील वीज देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे बंद करण्याचा इशारा दिला आहे. प्रत्यक्षात कामबंद आंदोलन सुरु झाले आहे. असोसिएशनने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार महावितरणने कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची बिले दीर्घ काळापासून थकवली आहेत. वारंवार मागणी करुनही बिले मिळत नसल्याने कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अधिकाऱ्यांकडून मनमानी कारभार केला जात असल्याचा आरोपही केला आहे. बिले तात्काळ द्या आणि अन्यायकारक कारभार थांबवा, अशी मागणी कंत्राटदारांनी केली आहे. आंदोलनामुळे ६ मे पासून उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी तसेच वितरण ट्रान्सफॉर्मर संदर्भातील सर्व प्रतिबंधात्मक व ब्रेकडाऊन कामे पूर्णपणे बंद राहणार आहेत. याचा थेट परिणाम जिल्ह्यातील वीज पुरवठ्यावर होण्याची शक्यता आहे. देखभाल कामे बंद राहिल्यास नागरिकांना वीज खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते. हा लढा जनतेच्या सुरक्षेसाठीच असल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहे. थकित बिले न मिळाल्याने दुरुस्ती साहित्य खरेदी करणे, कर्मचाऱ्यांचे वेतन देणे कठीण झाले आहे. त्यामुळे दर्जेदार काम करणे शक्य होत नाही. वीज व्यवस्था सुरळीत हवी असेल तर महावितरणने तातडीने थकित बिले अदा करावीत अशी मागणी त्यांनी केली आहे. कंत्राटदारांनी एकजुटीने लढा देण्याचे आवाहन केले असून हक्कासाठी लढा हीच बांधिलकी असल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान महावितरणने यावर तातडीने तोडगा काढावा अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



### नरसापूर घटनेतील आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा देण्याची मागणी

**सांगोला,दि. ५ मे -**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर, ता.भोर येथे चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ सांगोला तहसीलदार, पोलीस निरीक्षक यांना ब्राह्मण सभा व भगवान परशुराम युवक संघटना, सांगोला यांच्यावतीने निवेदन देण्यात आले आहे. पीडित बालिकेला तातडीने न्याय मिळावा तसेच आरोपीला कायद्यानुसार अत्यंत कठोर मृत्युदंड शिक्षा व्हावी तसेच या दरम्यान त्यांच्या कुटुंबियांना मानसिक आधार व कायद्याचे संरक्षण मिळावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पुढील कारवाईसाठी सदर निवेदनाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवली आहे. निवेदन देताना प्रा.भगवंत कुलकर्णी, डॉ.मानस कमलापूरकर, ज्ञानेश्वर कुलकर्णी, उपेंद्र पुजारी, मिताली बेले, अम रजा पुजारी, तृप्ती पुजारी, सुमेधा वांगीकर, श्रद्धा देशपांडे, सानिका जोशी, प्रिया कमलापुरकर, श्रीनिवास देशपांडे, श्रीकांत देशपांडे, रवींद्र देशपांडे, तेजस कुलकर्णी, ओंकार कुलकर्णी, श्रीनाथ बिडकर, हेमंत देशपांडे, माधव देशपांडे, निलेश ताकभाते, डॉ.ईशान भोसेकर, मंगेश कुलकर्णी, परमेश्वर गेजगे उपस्थित होते.

# ३० महिन्यात बदलणार पंढरपूरचा चेहरा-मोहरा

**पंढरपूर विकास प्रकल्प; पावणे तीन वर्षांचे उद्दिष्ट**

**आषाढी यात्रेनंतर कामाला सुरुवात**

**समर्थक-विरोधक आमने-सामने; काही स्थानिकांकडून विरोध**

**बाधितांकडून पुनर्वसनाच्या अटीवर स्वागत**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. ५ मे -**

तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारने तब्बल ४ हजार १५० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला अखेर मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दि.४ मे रोजी झालेल्या शिखर बैठकीत या प्रकल्पाला अंतिम हिरवा कंदील मिळाला आहे. दरम्यान आषाढी यात्रेनंतर या प्रकल्पाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. पुढील ३० महिन्यांत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट मुख्यमंत्र्यांकडून प्रशासनाला दिले आहे.

पंढरपूरमध्ये वर्षभर मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असल्याने आगामी ५० वर्षांचा विचार करून हा आराखडा तयार केला आहे. मात्र मंदिर परिसरातील कॉरिडॉरला सुरुवातीपासूनच काहीं संभाव्य बाधित नागरिकांकडून विरोध होत आहे. आता हा विरोध अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



कॉरिडॉरमुळे मंदिर परिसरातील अनेक घरे, दुकाने, वाडे आणि मठ बाधित होणार असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी आहे. विरोधकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने अद्याप संपूर्ण आराखडा स्पष्टपणे मांडलेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. काही विरोधकांनी हा प्रकल्प घाईघाईत राबवला जात असल्याची टीका करत सरकार विरोधात आंदोलनाचा इशाराही दिला आहे. पंढरपूरची पारंपरिक संस्कृती आणि वारकरी परंपरेला धोका निर्माण होईल, अशी भीतीही व्यक्त होत आहे. प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन ऑगस्टपर्यंत संपादित करण्याचे नियोजन आहे. हा प्रकल्प केवळ तीस महिन्यांमध्ये पुर्ण करण्याचे उद्दिष्ठ प्रशासनासमोर सरकारकडून ठेवले आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पंढरपूरमध्ये येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल आणि शहराचा विकास वेगाने होईल, असा सरकारचा दावा आहे.

### योग्य मोबदला, योग्य नियोजन आणि पारदर्शक पुनर्वसन करण्याची व्यापाऱ्यांची मागणी

दुसरीकडे, अनेक व्यापारी आणि स्थानिक नागरिकांनी योग्य पुनर्वसन आणि मोबदला मिळाल्यास प्रकल्पाचे स्वागत करण्याची भूमिका घेतली आहे. घर आणि दुकाने जाणाऱ्या नागरिकांनी सरकारवर विश्वास व्यक्त करत पर्यायी जागा, भूखंड किंवा दुकाने देण्याची मागणी केली आहे. काही व्यापाऱ्यांनी सांगितले की, योग्य मोबदला, योग्य नियोजन आणि पारदर्शक पुनर्वसन प्रक्रिया राबवली तर हा प्रकल्प पंढरपूरच्या विकासासाठी फायदेशीर ठरेल.

### प्रकल्पातील महत्त्वाची कामे आणि खर्च

४ हजार १५० कोटी रुपयांच्या प्रकल्पात विविध विकास कामांचा समावेश केला आहे. वारकरी सुविधा - २८८.६६ कोटी रुपये, मंदिर कॉरिडॉर - ५७९.२७ कोटी रुपये, नदी घाट विकास व सुशोभीकरण - ४४३.३९ कोटी रुपये, नगर प्रदक्षिणा मार्ग - १६२.९४ कोटी रुपये, शहर सुशोभीकरण - ४८०.५० कोटी रुपये, शहरातील वाहनतळ आणि व्यापारी संकुल -६८.४८कोटी रुपये, पूल आणि हेलिपॅड - १२७.६० कोटी रुपये, पालखीतळ विकास - १०० कोटी रुपये, भूसंपादन व पुनर्वसन - २०२६.७२ कोटी रुपये

### प्रकल्पाची पुढील वाटचाल

हा प्रकल्प देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट मानला जात आहे. यामुळे पंढरपूरला जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा सरकारचा मानस आहे. मात्र विरोधक आणि बाधित नागरिकांचे समाधान कसे केले जाते, यावरच आता या प्रकल्पाचे भवितव्य मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.

# पाच दिवसांत १६ हजार ३९४ जणांकडून स्व:जनगणना

**जिल्ह्यातील चित्र; १२ हजार ८२३ जणांकडून स्व:गणना पूर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ मे-**

जनगणना २०२७ ला १ मे पासून प्रारंभ करण्यात आला आहे. १५ मे पर्यंत तिची मुदत आहे. दरम्यान आतापर्यंत १ ते ५ मे पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील १६ हजार ३९४ जणांकडून स्व:जनगणनेत सहभाग घेतला. यातील १२ हजार ८२३ जणांनी स्व:गणना पूर्ण केली आहे.

आरडीसी अभिजित पाटील यांनी आज (दि.५) ही माहिती दिली. ही भारताची १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना आहे. पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना आहे. ही जनगणना केवळ लोकसंख्या व अनुषंगिक माहितीबाबत नसून ती एक भविष्यातील विकासाचे मापदंड ठरविण्याची प्रक्रिया आहे. प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ५ दिवसात जिल्ह्यातील १६ हजार ३९४ जणांनी सहभाग नोंदविला, तर १२ हजार ८२३ जणांनी स्व:गणना पूर्ण केली आहे.




१ मे पासून राज्यात जनगणना सुरू झाली आहे. यंदा पहिल्यांदाच स्व-गणना अशी नवीन प्रक्रिया सुरू आहे. राज्यासह सोलापूर जिल्ह्यासाठी स्व-गणना पोर्टल १ मे ते १५ मे पर्यंत कार्यरत आहे. अवघ्या १५ ते २० मिनिटात स्व-गणना प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. या स्व-गणनेदरम्यान कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करण्याची आवशकता नाही. राज्यातील नागरिकांना se.census.gov.in या संकेतस्थळावर जावून स्वत:ची माहिती ऑनलाईन भरता येईल. यानंतर १६ मे ते १४ जूनपर्यंत घरगणना होणार आहे. फेब्रुवारी २०२७ मध्ये जनगणनेचे अंतिम काम पूर्ण होणार आहे.

दरम्यान, यासाठी जिल्ह्यात २८ अधिकारी, ६,७४६ प्रगणक व १,१७५ पर्यवेक्षक करणार काम करणार आहेत. सोलापूर शहरासाठी ८ अधिकारी अन् २८०८ कर्मचारी काम करणार आहेत. संपूर्ण आणि अचूक माहिती अधिकाऱ्यांना देण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. देशात प्रथमच जनगणनाची माहिती डिजीटल माध्यमातून घेणार आहे. १६ मे ते १४ जून या काळात जनगणना करणारे अधिकारी भेट देणार आहेत. यासाठी राज्य शासनाने १६ फेब्रुवारी रोजी ३३ प्रश्न अधिसूचित केले आहेत. गृह-यादी टप्प्यात लोकांना हे प्रश्न विचारले जातील. यातून घराची स्थिती, सोयी-सुविधा आणि घरगुती मालमत्ता यांविषयीची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित होईल.

### पूर्णपणे मोबाईल ॲपचा वापर

जनगणनेसाठी पूर्णपणे मोबाईल ॲपचा वापर होणार आहे. यामध्ये १ मे ते १५ मे २०२६ स्व: गणना, १६ मे ते १४ जून घरयादी आणि घरगणना होणार आहे आणि फेब्रुवारी २०२७ ते मार्च २०२७ या कालावधीत जनगणना होणार आहे. स्व-गणना म्हणजे नागरिकांनी स्वतःहून जनगणनेची प्रश्नावली ऑनलाइन पोर्टलद्वारे भरणे, पूर्ण करणे आणि सबमिट करणे होय. नागरिक https://se.census.gov.in या पोर्टलवर जाऊन माहिती भरू शकतात.

## सरकारी कामात अडथळा केल्याच्या प्रकरणातून पिता-पुत्राची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मे-**

नितीन चंद्रकांत शिंदे व चंद्रकांत मधुकर शिंदे याच्याविरुद्ध वैराग पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्याच्या फिर्यादीवरुन १२ जानेवारी २०१९ रोजी सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. सुनावणीनंतर सत्र न्यायाधीश बार्शी यांनी आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

आरोपी पिता-पुत्रास ताब्यात घेऊन पोलीस ठाणे येथे अटक करणे कामी आले असता, आरोपी पोलिसांना धक्का देऊन पळून गेला व त्यांचा पाठलाग करीत असताना धक्का देऊन फिर्यादीस खाली पाडले. त्यात काचेचा तुकडा उजव्या पायाला लागून मोठी जखम झाली व आरोपींनी फिर्यादीस तुला जिवंत ठेवत नाही, कशी नोकरी करतो वैरागमध्ये असे म्हणून मारहाण केली, अशा स्वरुपाची फिर्याद पोलीस गोपाळ घोळवे यांनी दिली होती.



फिर्यादी पक्षाने आरोपीविरुद्ध गंभीर स्वरुपाचे आरोप केले होते. मात्र न्यायालयाने प्रकरणातील संपूर्ण पुरावे, साक्षीदारांचे जबाब, तपासातील बाबी व नोंदी यांचा विचार करून आरोपींची सबळ पुराव्या अभावी, संशयाचा लाभ देत सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता केली. आरोपी क्रमांक १ च्यावतीने ॲड. राजू शेख, ॲड. एम.आर. घाडगे व आरोपी क्रमांक २ च्यावतीने ॲड. सुहास कांबळे यांनी युक्तिवाद केला. सुनावणीअंती बार्शी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. एस. मलक्लपट्टे यांनी आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

# सांगोला विद्यामंदिर राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ मे-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजला शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना आणि स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार स्वीकारताना प्रशालेचे प्राचार्य बिभीषण माने, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, काकासो नरूटे उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके यांनी विशेष अभिनंदन केले.

# आ. रणजितसिंहांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य, रक्तदान शिबीर

**२३५ नागरिकांकडून रक्तदान; ४०० जणांकडून आरोग्य सेवांचा लाभ**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ मे-**

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रीनफिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, शंकरनगर येथे सत्यप्रभादेवी रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रक्तदान आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उपक्रमात २३५ नागरिकांकडून रक्तदान करण्यात आले. ६३५ जणांकडून आरोग्य सेवांचा लाभ घेण्यात आला.





अकलूज नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष युवा नेते शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि भगवान धन्वंतरींच्या पूजनाने या उपक्रमाचा शुभारंभ झाला. या प्रसंगी हॉस्पिटलच्या वतीने डीन डॉ. प्रशांत निंबाळकर यांनी प्रास्ताविक केले. शिबिरात एकूण ६३५ लाभार्थ्यांनी आरोग्य सेवांचा लाभ घेतला, ज्यामध्ये २३५ जणांनी रक्तदान केले, १५६ जणांचे जनरल चेकअप, ६१ ईसीजी, ६० नेत्र तपासणी, ५८ अस्थिरोग तपासणी, २२ एक्स-रे आणि १५ सोनोग्राफी तपासण्या करण्यात आल्या. या सोहळ्यात डॉ. एम. के. इनामदार यांनी उपस्थितांना वैद्यकीय मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अकलूज नगरपरिषदेचे प्रथम नगराध्यक्षा रेशमा अडगळे, मोटार वाहन निरीक्षक संदीप पाटील, शंकर सहकारी साखर कारखान्याचे एमडी स्वरूप देशमुख, डॉ. अमोल शिंदे, जनरल फिजिशियन डॉ. समीर दोशी, डॉ. बाहुबली दोशी (डायरेक्टर, दोशी पॅथॉलॉजी), निमा अध्यक्ष डॉ. अमोल माने आणि होमिओपॅथी संघटनेचे अध्यक्ष डॉ. अभिजित राजे भोसले यांचा प्रामुख्याने समावेश होता. तसेच संस्थेचे ट्रस्टी संजय राकले,सहसचिव शिवदास शिंदे हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप प्रशासकीय अधिकारी विक्रमसिंह बागल यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सत्यजित खताळ यांनी केले. उपस्थितांनी या समाजोपयोगी उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.